

RNI MAHMAR.43768/18/12/2013.TC ISSN 2454-8731 Peer Review Journal

# Rankranti Multidisciplinary Research Journal






## कोरोना - 19 नंतरच एक वर्ष - विशेषांक






कार्यकारी संपादक

डॉ. चांगदेव मुंढे

सह - संपादक

डॉ. कालीदास भांगे

संपादक

डॉ. उमेश पुजारी

VOL. 7 |Special - ISSUE 1| Feb. - 2021

Chaitanya Prakashan, Nanded - 431606

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | 125 - 128 |
| 24 | कोविड – 19 आणि महिला | कु. संगिता सा. बोरसे | 129 - 132 |
| 25 | कोरोनोचे आपत्ती व्यवस्थापन : सामाजिक विश्लेषण | डॉ. अशोक श. भालेराव | 133 - 135 |
| 26 | कोरोना आणि मानव | विष्णु मेटकर<br>डॉ. डी. एस. चव्हाण | 136 - 138 |



वरील संशोधन पत्रिकेतील सर्व लेखन किंवा मतांशी प्रकाशक, मुद्रक, संपादक, संपादन समिती सदस्य आणि प्रकाशनांच्या सर्व समितीचे सर्व सदस्य सहमत असतील असे नाही. वरील संशोधन लेखाची जबाबदारी ही त्या - त्या लेखकांची असेल. जर कुणाला प्रकाशनाची काही हरकत असेल तर त्यांची न्यायालयीन कार्यक्षेत्र नांदेड असेल.

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

# कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती

**प्रा.डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे,**
(समाजशास्त्र विभागप्रमुख)
दिंगबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर,
जि. नांदेड.

**प्रस्तावना :**

भारतीय समाज हा पुरुष प्रधान आहे. त्यामुळे महिलांना समाजात दुय्यम स्थान आहे. वैदिक कालखंड जर सोडला तर संपुर्ण कालखंड दुय्यम, हिन, उपभोग्य वस्तु अशीच अवस्था महिलांची दिसून आलेली आहे. समाजात जेव्हा श्रमाचे विभाजन झाले तेव्हापासून महिलांना कमजोर समजले आणि त्यांना चार भिंतींच्या आत ठेवले. 'चुल व मूल' हे त्यांचे विश्व होते. आधूनिक व उत्तर आधुनिक कालखंडात महिलांच्या स्थानात निश्चित परिवर्तन झाले व होईल असे स्पष्ट दिसते. आधुनिक काळात शिक्षणाला चालना मिळाली आणि महिलांना शिक्षण (सक्तीचे व मोफत) मिळाल्यामुळे दर्जा बदलला. तरीपण नौकरी, व्यवसाय, उत्पादक व राजकारण इत्यादी क्षेत्रात महिला असल्या तरी त्यांना भारतीय कुटुंबाची जबाबदारी आहेच. भारतीय कुटुंबातील सेवा व अन्य ठिकाणावरील सेवा क्षेत्रात आजही महिलाच अग्रेसर आहेत. सेवा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या महिलांना आणखी एक संकट 23 मार्च 2020 पासून भारतात आले आणि ते म्हणजे कोरोना. चीनच्या 'वुहान' शहरापासून निघून संपुर्ण जगभर पसरला. कोरोना कालखंडात 188 देशांनी लॉकडाऊन केले होते. लॉकडाऊनच्या काळात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या घरात बसून होता. तेव्हा सर्वाधिक भार जर कोणावर पडला असेल तर महिलांवर. कारण कुटुंबातील सर्व कामे आजही महिलाच करतात. महिला कोणत्याही क्षेत्रात काम करणारी असली तरी घरातील कामे व कुटुंबियांची सेवा, कामे, कार्यक्रम इत्यादीमध्ये त्यांच्यावर सर्व जबाबदारी असते. कोरोना काळातील घरकामे करणाऱ्या महिला बंद झाल्या आणि सर्व कामाचा भार कधीही काम न करणाऱ्या महिलावर पडला. त्यातून त्यांना आजार निर्माण झाले. परंतु कोरोनाच्या भितीने दवाखाणे होते. पण कोणीच जात नव्हते आजारावर फक्त मेडिकल घेवून बरा करणे व त्या आजाराला घेवून घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे .हेही ओझे त्यांच्याच पाठीवर होते. म्हणून कोरोणात महिलांची स्थिती वाईट झाली असे म्हटले जाते.

**उद्दिष्टये :**

- महिला आणि कुटुंबाची जबाबदारी समजून घेणे.
- महिलांचे कुटुंबातील स्थान व महत्त्व जाणणे.
- महिलांशिवाय कुंटुंबाची व पुरुषाची स्थिती जाणून घेणे.

**गृहिते :**

- आजही कुटुंबाची जबाबदारी महिलांवरच दिसते.
- समाजव्यवस्था व कुटुंबात महिलांचे स्थान अनन्यसाधारण वाटते.
- महिलांशिवाय समाजाची व कुटुंबाची कल्पना होवू शकते काय?

**संशोधन पद्धती :**

सदरील पेपर तयार करण्यासाठी तथ्ये संकलन हे फक्त दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातूनच आहेत. कारण लॉकडॉऊन मुळे प्राथमिक स्त्रोता आधार घेणे अशक्य आहे. लॉकडॉऊन काळात जे काही दै. पेपर, मासिके, बातम्या, व्हिडीओ, ऑडिओ, वॉट्सअप, फेसबुक इत्यादी माध्यमातून जी माहिती समोर आली. त्या माहितीला आधार मानून सदरील पेपर तयार करण्यात आलेला आहे. पेपर तयार करण्यात काही निरिक्षण पद्धतीचा उपयोग झालेला आहे. संशोधकाच्या परिसरातील काही दृश्य स्वतः पाहिले व अनुभवले आहेत. तरीपण संशोधनाचे महत्त्व हे महत्त्वाचे आहे. कारण आपण संशोधनात प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून तथ्ये संकलन करतो.

**संशोधनाचे महत्त्व :**

सदरील संशोधन हे कोरोना काळातील आहे. या काळात लॉकडॉऊनमुळे कुटुंबातील सर्व मंडळी (अबाल–वृद्ध) घरातच बसून होती आणि त्यांची सेवा पुरवणे व सर्व कामे महिलांना स्वतःच करावी लागत होती. ज्या महिला अर्थाजनासाठी घराबाहेर जात होत्या त्यांना घरकामाची व सेवा करण्याच्या सवयी नव्हत्या. परंतु लॉकडॉऊन मुळे मोलकरीण किंवा कामवाल्या महिला बंद झाल्या आणि सर्व जबाबदारी कधीही काम व सेवा न करणाऱ्या महिलांवर आली. त्याशिवाय सर्व मंडळी दिवस–रात्र घरात असल्याने घरातील कामात झालेली वाढ ही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे महिलांच्या आजारात झालेली वाढ लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**कोरोना आणि महिलांची कामे :**

जगभरात आरोग्य, कुटुंब व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या महिलाच आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही. कारण कोरोनाच्या पुर्वी व त्या काळातही सेवा करण्याची जबाबदारी महिलांवरच होती. परिस्थिती कोणतीही असो, युद्धाची, नैसर्गिक संकटांची वा कोरोना सारख्या मानवनिर्मित विषाणुची तरी सेवा करण्याची जबाबदारी महिलांवर पडलेली दिसते. कोरोना आणि लॉकडॉऊनचा परिणाम महिलांवरच झाला व त्यांना तो भोगावाही लागला. घरातील एखाद्याला कोराना झाला तर त्यापासून संसर्ग होण्याचीी भिती होती तरी त्या कोरोनाग्रस्ताची सेवा महिलाच करत होत्या. म्हणून संसर्ग होण्याची भिती होती व तसेच झालेले दिसून आले. नॅशनल स्मॅपल सर्व्हेने भारतीय रोजगार क्षेत्रावर एक अहवाल तयार केला. त्यांच्या अहवालानुसार भारतीय आरोग्य क्षेत्रात काम करण्यासाठी पात्र असलेल्या एकूण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत महिला 50 टक्के पेक्षा अधिक आहेत. आरोग्य क्षेत्रातील विविध स्तरांचा विचार केला असता असे दिसून आले की, नर्सेस व सेवा करणाऱ्यांची संख्या इतर राष्ट्रांच्या प्रमाणापेक्षा भारतात अधिक आहे.

जगभरात कोरोना काळात वर्क फॉर्म होम (Work from Home) हेच धोरण होते. त्याच बरोबर काही शाळांना सुट्ट्या लागल्या होत्या व काहींना लागणार होत्या. या बाबींचा सर्वाधिक भार घरातील महिलांवर पडला. अर्थात महिलांवर कुटुंबाचा एकूण ताण–तणाव अधिक वाढलेला होता. भारताच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने 2019 मध्ये पिरीऑडीक लेबर फोर्स सर्व्हे ऑफ इंडिया (PIFS) चे सर्वेक्षण प्रसिद्ध केले होते. त्यात असे आढळून आले की, भारतातील महिलांना फक्त बालसंगोपन, पोषण, पुर्व–प्राथमिक शाळा आणि पाळणाघर अशा काही मोजक्या क्षेत्रातील व्यवसायिक पशिक्षण मोठ्या प्रमाणावर दिले जाते. या क्षेत्रातील प्रशिक्षित स्त्रियांचे प्रमाण 18 टक्के आहे. तर पुरुष फक्त 1.2 टक्के आहेत. शाळा बंद असल्यामुळे या क्षेत्रात काम

करणाऱ्या महिलांना किती ताण–तणाव वाढला असेल आणि त्याचा त्यांच्या आरोग्यावर काय काय? व किती परिणाम झाला असेल याचा कोणीही अंदाजही व्यक्त केला नसेल.

बिगर क्षेत्री क्षेत्रात काम करणाऱ्या 31.7 टक्के महिला या घरात राहूनच काम करणाऱ्या आहेत. याच्या तुलनेत पुरुष फक्त 11 टक्के आहेत. काही लोकांना घरातून काम या संकल्पनेत फक्त जागा बदल झाले अन्यथा कोठेही तीच कामे होती. घरातून काम करणाऱ्या स्त्रिया स्वयंरोजगार करतात. (उदा. मास्क तयार करुन देणे) म्हणजे त्यांना इतर कंपन्या जसे फायदे देतील तसे फायदे मात्र कोणी देणार नाही. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांचा आकडा निश्चित कोरोनामुळे वाढला असणार. (PLFS) पी.एल.एफ.एस. च्या सर्वेक्षणानूसार अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण 54.8 टक्के झाले. म्हणजे कोरोनामुळे महिलांवर विचित्र परिणाम होत होता. याशिवाय काही महिलांनी आशा (ASHA) व अंगणवाडी सेविका म्हणून काम केले. अशा महिलांची संख्या 1.4 दशलक्ष आहे. अशी कामे करणाऱ्या महिलांना स्वतःचे कुटुंब, स्वतःचे आरोग्य सांभाळून कामे करावे लागले. तेव्हा किती ताण आला असेल, त्यांना स्वतःच्या संरक्षणासाठी पी.पी. किटही मिळाल्या नाहीत. आणि ज्यांना पी.पी. किट मिळाल्या त्यांना दिवसभर काढताही आल्या नाहीत. तेव्हा या बाबींचा त्यांच्या शरीरावर काय परिणाम होत असेल याचा विचार समाजाने केला नाही.

**महिला म्हणून आरोग्य सुविधा आणि कोरोना काळ :**

महिलांना समाजाने नेहमीच दुय्यम मानले. अत्यावश्यक असणारी लैगिंक आणि प्रजनन आरोग्यसेवेची साधने आपत्कालीन प्रतिसादासाठी वापरली जातात. मोठ्या प्रमाणात संक्रमित होणाऱ्या संसर्ग आजाराचा उद्रेक झाल्यास प्रजनन आणि लैंगिक आरोग्याचा अभावही दिसतो. महामारीच्या काळात अर्थात लॉकडॉऊनच्या काळात गर्भवतींचे प्रमाण अधिक वाढणार हे जागतिक भाकित आहे. या अवस्थेत महिलांच्या आरोग्यात वाढ होते व त्यांच्या जिवाला अधिक धोक्याची संभावना असते. त्यासारखे. एक उदाहरण आहे, ते म्हणजे आफ्रिकेत इबोलाची साथ पसरली होती, तेव्हा गर्भवती महिलांवर याचे काय? काय? व किती? परिणाम झाले हे सर्व अहवाल त्यांनी प्रसिद्धीपासून दूर ठवेले. परंतु तेथील सुईन म्हणून काम करणाऱ्या किंवा पहिलीच बाळंतपणाची पाळी असले अशा महिलांना फार संघर्ष करावा लागला. याचा परिणाम असा दिसला की, इबोल साथीच्या काळात, गिनीया, सिएरा, लिओरी आणि लाइबेरिया या शहरामधील दवाखाण्यातील प्रस्तुतीचे प्रमाण 30 टक्केनी घसरले आणि माता मृत्यूचे प्रमाण 75 टक्केने वाढले होते. म्हणून भारतात ही कोरोनाच्या काळात काय? काय? झाले असेल ते सद्य स्थिती काही स्पष्ट झाले नाही. अर्थात भारतीय दवाखाण्यांना सजग राहण्याची गरज होती. परंतु ती या काळात कोठेच दिसलेली नाह.ी कारण प्रत्येकाच्या मनात कोरोनाची भिती होती. NFHS-4 आकडेवारीनुसार भारतात फक्त 21 टक्के महिलांच प्रस्तूती कालीन आरोग्यसेवा भेटली. भारतात सर्वाजनिक रूग्णालयात प्रसूती झाल्यास जननी सुरक्षा योजने अंतर्गत आर्थिक लाभ फक्त 36.4 टक्के महिलांना मिळला आहे. कोरोना काळात सर्व कंपन्या बरोबर औषधीनिर्मितीच्या कंपन्या बंद झाल्याने औषध–गोळ्यांवरही परिणाम झाला. भारतातील स्वस्त मिळणाऱ्या जेनेरिक गोळ्या तयार करणाऱ्या कंपन्यांना फार विलंब होत होता. चीनचे तर सर्व बंद होते. यामुळे गर्भनिोधक साधने, गोळ्या, लैगिंक संबंधातून निर्माण होणाऱ्या आजारात गरजेची असलेली अँटी–बायोटिक्स, एडस् बांधितांसाठीच्या अँटीरीट्रोवहायरल्स इत्यादींचा तुटवडा निर्माण झाला व परिणाम ही महिलांना अधिक भोगावा लागला.

**सारांश :**

भारतासह जगभरातील महिलांवर कोरोनाचा परिणाम झालेला दिसतो. महिलांच सेवा व आरोग्य क्षेत्रात अग्रेसर आहेत. याशिवाय त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या पार पाडून त्यांची बाहेरची कामेही करणे त्यांच्यासाठी तारेवरची कसरत ठरते. तेव्हा अशा महामारीच्या लॉकडॉऊनमुळे महिला म्हणून दुय्यम स्थान मिळतेच परंतु अशा काळात तर फारच दुर्लक्षित टाकले गेले. याशिवाय या काळात गर्भवतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता होती. त्यानुसार आवश्यक असलेल्या सोयीसुविधा नसतात. त्याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावर कसा होतो. हेही दिसते. जगातील काही देशात या पुर्वी अशा काही महामारी आल्या व गेल्या त्या काळातील परिणाम नंतर समोर आले. तोच धडा भारताने घेतला तर खरोखर महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. असेच दिसते. परंतु भारतासारख्या पुरुष प्रधान समाजात आजही फारसे महत्त्व दिलेल दिसत नाही. जे काही मिडीयाच्या माध्यमातून दिसते ते फार अल्प आहे. जे पडद्यामागे आहे ते संख्येने खूप अधिक आहे.

**संदर्भ सूची :**

- हो मराठी कोरुं आणि महिला आदिती रथो जैन 3 एप्रिल 2020
- महिला धोरण 2013 मसुदा बालविकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई दै. पेपर, साधना साप्ताहिक.
- पाऊस मराठी बातम्या महाराष्ट्र भारत आंतरराष्ट्रीय व्हिडिओ 26 एप्रिल 2020टि.व्ही.वरील महाचर्चा.
- रविवार संवाद इन्फोग्राफिक अग्रलेख महाराष्ट्र टाईम अपलोड बारा एप्रिल दोन हजार वीस
- ई सकाळ कोरोना नंतरची सामाजिक आरोग्य मराठी आर्टिकल्स तयार करून आरोग्य यंत्रणा 13 जून 2020